# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 11 October 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ११ ऑक्टोबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- पीएम धनधान्य कृषी योजना आणि कडधान्य उत्पादन आत्मनिर्भरता मोहिमेला पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ
- कृषी क्षेत्रात कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर गेम चेंजर ठरेल–मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा छत्रपती संभाजीनगर इथे हंबरडा मोर्चा

आणि

- वेस्ट इंडीजविरुद्ध दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा पहिला डाव ५१८ धावांवर घोषित

****

पीएम धनधान्य कृषी योजना आणि कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज प्रारंभ झाला. नवी दिल्लीत झालेल्या या कार्यक्रमात कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातल्या पाच हजार ४५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचंही पंतप्रधानांनी उद्घाटन केलं. सुमारे ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या या कृषी योजनांतून शेतकरी कल्याण, कृषी स्वावलंबन आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा बळकट करण्यात येणार असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येणार असून, या योजनेअंतर्गत तूर, उडीद, मसुर या कडधान्यांचं उत्पादन वाढवलं जाईल, याचा फायदा दोन कोटी शेतकऱ्यांना होईल, असं पंतप्रधानांनी सांगितलं. या योजनेत पशूधनावरही विशेष लक्ष दिलं जाणार असल्याची माहिती देतांना ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

गेल्या अकरा वर्षात कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा मोदी यांनी आढावा घेतला. या काळात अन्नधान्य उत्पादन ९०० लाख मेट्रिक टन वाढलं, फळभाज्या उत्पादन ६४० लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त वाढलं, सहा मोठ्या खत उत्पादक कंपन्या उभ्या राहिल्या, मत्स्योत्पादन, मध उत्पादन दुप्पट झालं, कृषीमालाची निर्यात दुप्पट झाली असं पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं.

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं. केंद्र सरकारच्या स्वदेशीच्या आवाहनाला शेतकरीही प्रतिसाद देत असून स्वदेशीची भावना त्यांच्यामधे रुजत आहे, असं चौहान यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान**

****

पीएम धनधान्य कृषी योजनेत देशातल्या १०० जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, त्यात राज्यातल्या छत्रपती संभाजीनगर, बीड आणि नांदेडसह नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे.

नांदेड जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनामध्ये करण्यात आलं. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी यावेळी बोलतांना, आपल्या समोरच्या विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीसह शेतीपूरक व्यवसायांवर भर द्यावा, असं आवाहन केलं. जिल्ह्यातले शेतकरी भगवान इंगोले यांनी आपला अनुभव या शब्दांत मांडला.

**बाईट – भगवान इंगोले**

परभणी येथील कृषी विज्ञान केंद्रात दूरदृष्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमाचं प्रसारण दाखवण्यात आलं. जिल्ह्यातील शेतकरी, महिला शेतकरी, कृषी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरिता जाधव आणि पंढरीनाथ इक्कर यांनी आपलं मनोगत या शब्दांत व्यक्त केलं –

**बाईट – सरिता जाधव आणि पंढरीनाथ इक्कर**

****

अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानाबाबतची माहिती संकलित करण्यात येत आहे. त्याबाबतचे काम अंतिम टप्प्यात असून, निधीसाठीचा प्रस्ताव लवकरच केंद्र सरकारला पाठवण्यात येणार असून, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. पुण्यात राज्य

कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेत झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. सप्टेंबरमध्ये झालेल्या पावसामुळे मराठवाड्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कृषी, महसूल विभागाकडून कर्मचारी माहिती संकलित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. दिवाळीपूर्वी सर्व शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं.

****

कृषी क्षेत्रात कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर गेम चेंजर ठरेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत एचपी आणि इंटेल यांच्या 'एचपी ड्रीम अनलॉक्ड' या उत्सवाचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून समाजात साक्षरता आणि समता निर्माण होऊ शकते, असं सांगत, हे तंत्रज्ञान प्रत्येक भारतीयांच्या कल्पनांना आकार देऊ शकत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं.

****

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त राज्यातून मोठ्या संख्येनं आलेल्या भाविकांनी अमरावती इथल्या श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमात तुकडोजी महाराजांना मौन आदरांजली अर्पण केली.

दरम्यान, नागपुरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने तुकडोजी महाराजांच्या गीत गायनाच्या विश्वविक्रमाची नोंद केली. एकाच वेळी १६ हजार पेक्षा अधिक जणांनी प्रत्यक्ष तर १५ हजारांपेक्षा अधिक जणांनी डिजिटल प्लॅटफॉर्मवर सहभाग नोंदवत, महाराजांच्या 'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे...' या गीताचं गायन केलं. या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसह एकूण चार विश्वविक्रमाची ऐतिहासिक नोंद विद्यापीठानं केल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

****

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात आज छत्रपती संभाजीनगर इथे हंबरडा मोर्चा काढण्यात आला. यावेळी उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारवर टीका करत, सरकारनं जाहीर केलेलं पॅकेज अमान्य असल्याचं सांगितलं. यावेळी त्यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याची मागणी करत संपूर्ण कर्ज माफीच्या मागणीचा पुनरुच्चार केला.

****

क्रिकेट

भारत आणि वेस्ट इंडिज क्रिकेट संघा दरम्यान नवी दिल्लीत सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं आपला पहिला डाव ५ बाद ५१८ धावसंख्येवर घोषित केला. कर्णधार शुभमन गिल १२९ धावांवर नाबाद राहिला. यासोबतच त्याने एका कॅलेंडर वर्षात पाच शतकं करण्याच्या विराट कोहलीच्या विक्रमाचीही बरोबरी केली. दरम्यान, आजच्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा वेस्ट इंडीजच्या चार बाद १४० धावा झाल्या होत्या.

****

बीसीसीआयच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर झाला असून यात छत्रपती संभाजीनगर चा अंकित बावणे महाराष्ट्राचं कर्णधारपद भूषवणार आहे. या संघात बीडचा यष्टिरक्षक सौरभ नवले याची यष्टीरक्षक म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे चेअरमन सचिन मुळे यांनी ही माहिती दिली.

****

आगामी बीड नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार पक्षाची बैठक आज आमदार संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. शहरातील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार या बैठकीला उपस्थित होते. महत्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री इथं शेतकरी भवनासाठी दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. याद्वारे, या समिती कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना आधुनिक सुविधा, प्रशासकीय सोय आणि शेतमाल खरेदी-विक्रीसाठी सक्षम व्यवस्था उभी राहील्यानं विकासाचं नवं केंद्र मिळणार असल्याची माहिती आमदार अनुराधा चव्हाण यांनी दिली आहे.

****

लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराचे नगरपरिषदेमार्फत सुशोभिकरण करण्यात येत आहे. या कामाची सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज पाहणी केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केलं.

✻✻✻✻

हवामान

राज्यात आज विदर्भाच्या काही जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. कोकणातल्या काही जिल्ह्यांत जोरदार वाऱ्यांसह पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

✻✻✻✻